महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५० वे | दिनांक : २४/०५/२०२६ | वार : रविवार

# मनोज जरांगेंवर टीका करताना लक्ष्मण हाके यांची जीभ घसरली



**मुंबई** : मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील वातावरण पुन्हा तापू लागले असून मनोज जरांगे पाटील यांच्या आगामी आमरण उपोषणाच्या घोषणेनंतर आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांना वेग आला आहे. ३० मेपासून अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू करण्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिल्यानंतर भाजप आमदार प्रसाद लाड यांनी त्यांची भेट घेत चर्चा केली.
मात्र या भेटीनंतर ओबीसी आंदोलक प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी संतप्त प्रतिक्रिया देत जरांगेंवर अत्यंत बोचऱ्या शब्दांत टीका केली आहे. त्यांच्या वक्तव्यामुळे आता नव्या वादाला तोंड फुटले आहे.
प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांच्यावर बोलताना आक्रमक भाषा वापरली. जरांगे, खुळखुळ्या तुला अक्कल नावाचा प्रकार नाही, अशा शब्दांत त्यांनी टीका केली. पुढे बोलताना त्यांनी म्हटलं की, न्यायमूर्ती आले, सचिव आले, मुख्यमंत्रीही भेटून गेले, तरी जरांगेंच्या भूमिकेत बदल झाला नाही. मग एखादा हॉटेल चालवणारा किंवा झाडूपोछा करणारा व्यक्ती भेटून काय फरक पडणार? अशा शब्दांत त्यांनी अप्रत्यक्षपणे प्रसाद लाड यांच्यावरही निशाणा साधला. या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.
लक्ष्मण हाके यांनी प्रसाद लाड यांच्यावरही उपरोधिक टीका केली. एक लाख लोकांना रोजगार दिल्याबद्दल त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार मिळायला हवा, असा टोला त्यांनी लगावला. आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत प्रसाद लाड यांना कितपत माहिती आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. राजकारणाचा फायदा घेत अजून मोठं व्हावं, पण आरक्षणाच्या विषयात उगाच हस्तक्षेप करू नये, असा सल्लाही त्यांनी दिला. तसेच भाजपच्या बळावर काही जण बेडकासारख्या उड्या मारत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.
ओबीसी समाजाच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही हाके यांनी यावेळी केला. ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी आम्ही ग्रामीण भागात शंभर सभा घेत आहोत, मात्र आम्हाला कोणताही निधी दिला जात नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. दुसरीकडे, मनोज जरांगे आंदोलनाची घोषणा करताच सरकारकडून शेकडो कोटी रुपयांच्या घोषणा केल्या जातात, असा आरोप त्यांनी केला. जातगणना व्हावी, ओबीसींचे प्रश्न मार्गी लागावेत यासाठी आम्ही सातत्याने लढत आहोत, मात्र शासनाकडून दुजाभाव केला जात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.
दरम्यान, मराठा समाजाच्या मागण्यांसाठी प्रसाद लाड यांनी राजीनामा देण्याची तयारी दर्शवली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना हाके म्हणाले की, त्यांनी आधी राजीनामा द्यावा आणि नंतर जातीचं राजकारण करावं. ओबीसींच्या हक्कांवर गदा आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. भाजपला सत्तेत आणण्यात ओबीसी मतदारांचा मोठा वाटा असल्याचं सांगत त्यांनी सरकारला इशारा दिला. ओबीसींच्या अन्नात माती कालवण्याचा प्रयत्न आम्ही सहन करणार नाही, असेही ते म्हणाले.
मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर राज्यात पुन्हा एकदा मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष तीव्र होताना दिसत आहे. एका बाजूला सरकार चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढण्याचा प्रयत्न करत असताना दुसऱ्या बाजूला नेत्यांच्या आक्रमक वक्तव्यांमुळे वातावरण अधिक तापत आहे. आगामी काही दिवसांत या वादावर राजकीय प्रतिक्रिया आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रोफेसर डॉ संजीव सोनवणे सर यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना मुक्त विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्राचे संचालक डॉ. नंदकुमार राठी आणि प्राचार्य डॉ. हसन इनामदार दिसत आहेत

# मंत्री अदिती तटकरेंचा खासगी सचिव वादाच्या भोवऱ्यात



**मुंबई** : राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या खासगी सचिवावर गंभीर आरोप करण्यात आलेत. त्यांच्यावर महिला अधिकाऱ्यांशी अश्लील भाषेत संवाद साधणे तसेच बदल्यांचे रॅकेट चालवण्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. यामुळे मंत्रालयीन वर्तुळात मोठी खळबळ माजली असून, स्वतः अदिती तटकरेही यामुळे अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी या प्रकरणी अदिती तटकरे यांचे या गायकवाड सोबत काही आर्थिक लागेबांधे आहेत का? असा सवाल उपस्थित केला आहे.यासंबंधीच्या माहितीनुसार, महिला व बालविकास राज्यपत्रित अधिकारी संघटनेने एका निवेदनाद्वारे मंत्री अदिती तटकरे यांचे खासगी सचिव राजेश गायकवाड यांच्याविरोधात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. या तक्रारीत राजेश गायकवाड यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आलेत. संघटनेने आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, राजेश गायकवाड यांच्या गैरवर्तनाबाबत नमूद मुद्दे अत्यंत गंभीर व वस्तुस्थितीदर्शक आहेत. या प्रकरणी तात्काळ दखल घेणे अत्यंत निकडीचे आहे. तसे न झाल्यास अनेक अधिकारी यांची व्यावसायिक हानी व जीवितास गंभीर धोका होईल अशी शक्यता आहे. राजेश गायकवाड हे स्वतःच्या पदाचा गैरवापर करून मंत्री महोदयांच्या अपरोक्ष गंभीर स्वरूपाचे गैरवर्तन करत आहेत. त्यांचे वर्तन अत्यंत गंभीर व नियमबाह्य आहे. त्याचा अनुभव अनेक अधिकाऱ्यांना आला आहे. पण बरेच अधिकारी व्यावसायिक हानी होण्याची शक्यता व राजेश गायकवाड हे पदाचा गैरवापर करून खोट्या प्रकरणात गोवतील या आशंकेने त्यांचे गैरवर्तन नाईलाजास्तव सहन करत आहेत.
महिला अधिकारी यांना अत्यंत अपमानास्पद वागणूक देणे, महिला अधिकारी यांच्याबाबत लज्जास्पद वर्तन करणे, महिला अधिकाऱ्यांना वारंवार अश्लील व घाणेरड्या शब्दांना सामोरे जावे लागणे अशा गंभीर बाबी आहेत. महिलांबाबत राजेश गायकवाड यांचा दृष्टिकोन अत्यंत संकुचित, असंस्कृत, बेजबाबदार व असंवेदनशील आहे. अल्पसंख्यांक व सामाजिक दृष्ट्या वंचित घटकातील अधिकारी यांच्याविषयी राजेश गायकवाड यांचा दृष्टिकोन अत्यंत संकुचित व आकस बुद्धीचा आहे. सामाजिक पार्श्वभूमीवरून अधिकाऱ्यांना अपमानास्पद वागणूक देण्याचे कृत्य संबंधीतांकडून असल्याचे दिसून येते. या अनुषंगाने कार्यरत अधिकारी यांची तक्रार प्राप्त आहेत, असे संघटनेने म्हटले आहे.
राजेश गायकवाड हे विभागातील विशिष्ट अधिकाऱ्यांना व्यावसायिक दृष्ट्या अपमानास्पद वागणूक देऊन, त्यांची उदाहरणे इतरांना दाखवून अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करतात. विभागाकडील बदल्या व प्रतिनियुक्ती प्रकरणांमध्ये त्यांनी स्वतःची एक समांतर यंत्रणा / रॅकेट तयार केले असून त्या माध्यमातून ते अनेक अधिकाऱ्यांचे आर्थिक शोषण, अनेक अधिकाऱ्यांची बदनामीकारक कथानक तयार करणे व अशा प्रकारांना प्रतिसाद न देणाऱ्या अधिकाऱ्यांना अत्यंत गैरसोयीचे व विपरीत पदस्थापना दिली जाईल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. स्वतःचे आर्थिक हित जोपासण्यासाठी काही त्रयस्थ व्यक्ती व अधिकारी यांना हाताशी धरून त्यांच्या माध्यमातून आर्थिक गैरव्यवहार करतात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ मे २०२६


## "जिथे अपमान होतो तिथे"

जिथे शब्दांना नाही किंमत ,
तिथून मौनानेच निघून जावे,
स्वाभिमानाच्या पायवाटेवर
डोळे मिटून चालत राहावे।

जिथे प्रेमाला नसते मोल,
नात्यांना बाजार समजतात,
मनाच्या कोवळ्या भावनांना
लोक तिथे खेळ समजतात।

तिथे पुन्हा कधीच जाऊ नये,
मन पुन्हा तिथे गुंतवू नये,
जखम जुनी भरली तरी
तिला पुन्हा उघड होऊ देऊ नये!

अपमानाच्या राखेमधुनी
आत्मविश्वास जळतो हळू,
हसऱ्या चेहऱ्यामागे लपलेले
दुःख रडते एकटेच हळू हळू।

जिथे तुमच्या अस्तित्वाला
कधी मानच मिळत नाही,
तिथे उभे राहून स्वतःलाच
वारंवार हरवू नये काही!

जग मोठं आहे खूप सारे,
इथे माणसे सोन्यासारखी,
काही नजरा प्रेम देणाऱ्या,
काही हृदये चांदण्यासारखी।

मग का धरावा हट्ट असा
जिथे तुच्छ लेखले जाते?
जिथे आपल्या भावना रोज
निर्दयीपणे तोडल्या जातात।.

जिथे सन्मान हरवतो आपला,
तिथे पाऊल मागे घ्यावे,
स्वाभिमानाच्या मंदिराला
कधीच तडे लागू न द्यावे,!

कारण माणूस पैशाने मोठा नाही,
मोठा असतो त्याच्या मनाने,
ज्याला दुसऱ्यांच्या अश्रूंशी
खेळायचं,
तो भिकारी असतो विचाराने।

जिथे अपमान होतो सतत
तिथे नाती टिकत नसतात,
फक्त चेहऱ्यावर हसू ठेवून
आतून माणसे मरत असतात।

स्वाभिमान विकून मिळणारे
प्रेम कधीच खरं नसते,
आणि अपमान सहन करून
जगणे
हे आयुष्याला शोभत नसते।



**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**

# युवा उद्योजक आणि समाजसेवक पंडित जळकोटे यांना 'बसवरत्न पुरस्कार' प्रदान



**मुरुम (सुधीर पंचगल्ले) :** केशेगाव ता तुळजापूर येथील प्रसिद्ध युवा उद्योजक, समाजसेवक आणि धाराशिव जिल्हा बसवरत्न पुरस्कार सोहळ्याचे यशस्वी संयोजक श्री. पंडित जळकोटे यांना सोलापूर मध्यवर्ती महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा मंडळ यांच्या वतीने या वर्षीचा मानाचा 'बसवरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे. सोलापूरचे पालकमंत्री नामदार श्री. जयकुमारजी गोरे यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार अत्यंत दिमाखदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला. पंडित जळकोटे यांनी उद्योग क्षेत्रासोबतच सामाजिक कार्यात घेतलेला पुढाकार आणि समाजहितासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना हा सर्वोच्च सन्मान बहाल करण्यात आला आहे.श्री. पंडित जळकोटे यांनी केवळ व्यावसायिक क्षेत्रातच आपली ओळख निर्माण केली नसून, गोरगरीब, गरजू आणि समाज घटकांसाठी नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. धाराशिव जिल्हा बसवरत्न पुरस्कार सोहळ्याचे संयोजक म्हणून त्यांनी सामाजिक व सांस्कृतिक चळवळीला मोठी गती दिली आहे. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे त्यांचे कार्य आणि समाजाप्रती असलेली त्यांची निष्ठा आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. हा पुरस्कार त्यांच्या याच अविरत सेवाभावाचा आणि समाजकार्याचा गौरव करणारा ठरला आहे.पंडित जळकोटे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. "पंडित जळकोटे यांच्या रूपाने एका खऱ्या समाजसेवकाचा आणि कर्तृत्ववान युवा उद्योजकाचा योग्य सन्मान झाला आहे.

# महाराष्ट्रात डिझेलसाठी शेतकऱ्यांची झुंबड; पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा



**मुंबई :** महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेल टंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत असून विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. खरीप हंगामाच्या तोंडावर पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू असताना ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळत नसल्याने अनेक ठिकाणी शेतीची कामे ठप्प झाली आहेत. वाशिम, बुलढाणा, हिंगोली, जळगाव आणि जालना जिल्ह्यात पेट्रोल पंपांवर रात्रीपासूनच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून अनेक शेतकऱ्यांना ट्रॅक्टरवरच रात्र काढावी लागत आहे. काही ठिकाणी तर नो स्टॉकचे फलक झळकत असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

वाशिम जिल्ह्यात सलग नवव्या दिवशी डिझेलसाठी शेतकऱ्यांनी रात्रीपासून रांगा लावल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दुसरीकडे बुलढाणा जिल्ह्यात अकराव्या दिवशीही संकट कायम असून मागणी आणि पुरवठ्यातील तफावतीमुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे दिसत आहे. मे महिन्यात शेती मशागतीसाठी ट्रॅक्टरचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढतो. त्यामुळे डिझेलची मागणी जवळपास 20 ते 25 टक्क्यांनी वाढली आहे. मात्र पुरेसा पुरवठा होत नसल्याने अनेक पेट्रोल पंपांवर शेतकरी रात्रंदिवस थांबून डिझेलची वाट पाहत आहेत. काही ठिकाणी गोंधळ आणि वादाचे प्रकारही समोर आले असून तलवारी आणि कोयते काढल्याच्या घटनांमुळे पेट्रोल पंप कर्मचारीही दहशतीत असल्याचे सांगितले जात आहे.

जळगाव जिल्ह्यात याचा मोठा फटका पूर्व हंगामी कापूस लागवडीला बसत आहे. दरवर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात हजारो हेक्टरवर कापसाची लागवड केली जाते. मात्र यंदा डिझेल मिळत नसल्याने ट्रॅक्टरद्वारे मशागत पूर्ण होऊ शकलेली नाही. अनेक शेतजमिनी अद्याप पडून असून मागील वर्षाच्या तुलनेत लागवड कमी प्रमाणात होत असल्याचे दिसून येत आहे. हिंगोली जिल्ह्यातही आठवडाभरापासून डिझेल टंचाई कायम आहे. बहुतांश पेट्रोल पंपांवर नो स्टॉकचे बोर्ड लागले असून जिथे डिझेल उपलब्ध आहे, तिथे वाहनांच्या किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या आहेत. काही शेतकरी अनेक तास वाहनातच बसून आपला नंबर येण्याची वाट पाहताना दिसत आहेत.

बुलढाणा ते चिखली रस्त्यावरील दांडगे यांच्या पेट्रोल पंपावर शेतकरी ट्रॅक्टरसह रात्रभर रांगेत उभे असल्याचे चित्र समोर आले आहे. रात्री पंप बंद असला तरी सकाळी टँकर येईल आणि डिझेल मिळेल, या आशेवर शेतकरी थांबले आहेत. दुसरीकडे जालना जिल्ह्यात 59 पेट्रोल पंपांवरील इंधन साठा संपला आहे. जालना तालुक्यात सर्वाधिक 24 पंप बंद असल्याने नागरिक आणि शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. कळमनुरी तालुक्यातील आराटी येथील शिवपार्वती पेट्रोल पंपावर डिझेलसाठी लागलेल्या रांगेतून दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली. या घटनेत काही शेतकरी जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर नागपूर जिल्हा न्यायालय प्रशासनानेही महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. इंधन बचतीसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी घेण्यावर भर देण्यात आला असून अत्यावश्यक कामांशिवाय न्यायालयात येऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. वकील संघटनांना देखील सहकार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. देशहितासाठी इंधनाचा योग्य वापर करण्याचे पत्र न्यायालय प्रशासनाने जारी केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरन्यायाधीशांच्या सूचनांनंतर हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.


इंधन टंचाईवरून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनीही सरकारवर निशाणा साधला आहे. मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशात डिझेलसाठी शेतकऱ्यांना 10 ते 15 तास रांगेत उभे राहावे लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. साठेबाजीसाठी शेतकरी डिझेल घेत नाहीत. त्यांच्याकडे एवढा वेळही नाही, असे सांगत त्यांनी पुरवठा साखळीतील त्रुटींवर बोट ठेवले. दरम्यान पेट्रोल आणि डिझेलच्या दरात तिसऱ्यांदा वाढ झाली आहे. मुंबईत पेट्रोलचा दर प्रतिलिटर 108.45 रुपयांवर तर डिझेलचा दर 95.02 रुपयांवर पोहोचला आहे. त्यामुळे आधीच इंधनटंचाईने त्रस्त असलेल्या नागरिकांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ मे २०२६


# खरा वारस : आजच्या स्त्री संघर्षाच्या मर्मग्राही कथा




महाराष्ट्रातील कथा साहित्यिक म्हणून हरिश्चंद्र पाटील यांचा पाचवा कथासंग्रह.प्रस्तूत कथासंग्रहात एकूण नऊ कथा.कथासंग्रहात आजच्या समकालीनातलं गावखेडं कसं भयान झालं आहे.कारण खेडं आर्बळलं बावचळलं, अन् यंत्रवादानं चक्काळल,बोकाळलं, अन् घुदाट शहरात उधळलं.अन् सुरू झाला 'खरा वारस' मारामारी,खुपासा खुपशी.मुलगी नको.वंशाला दिवा हवा.हाच दिवटा जन्मदात्या विसरून जातो.त्यांना दु:ख देतो.त्यांना आधाराच्या ऐवजी अंधार देतो.पण तीचं मुलगी माय बापाला आधार देते.वशांचा दिवा मात्र दिवटा होऊन मायबापलाच भाकरीसाठी मवताज करतो पोटगीचा दावा.मुलगी जी नकोशी होते तिचं मायबापला खरा वारस ठरते.आजोबाची लाडकी नात छकुली लग्न नको मला शिकू द्या.ती घर सोडून जाते.दोन दिवस उलटून जातात.पेपरमध्ये बातमी येते.जगंल झुडपात तरुणीचा कांदा ठेसावा तसा चेहरा ठेसलेला मृतदेह सापडतो.आई वडीलांना धरणी ठाव देतं नाही.तिचे प्रेत जाळले जाते.इकडे आजोबां दम्याच्या तडाख्यातून यंत्र न सापडल्याने मृत्यू पावतात.खरी छकुली सुटकेस घेवून घरी येते.आजोबा नाही म्हणून छकुली रडते.ही हृदय स्पर्शी कथा आजचा समकाल उभा करते.या कथासंग्रहात स्त्रीप्रधान कथा आहेत.कथासुत्र अत्यंत बळकट आहे.माहेरची वाट,बाजार आमटी,वचन,सवाष्ण, प्रेमपत्र, सौभाग्यदान,लढ पोरी लढ या कथेतील नायिका स्त्रीपात्रे अतिशय खमके दाखविले आहे.या कथेतील वैशिष्ट्ये स्थळ काळ हा महत्त्वाचा घटक आहेच.जसे बलात्काराला स्थळ काळ, वेळ वयाची जाती-पातीची आणि नात्याचीही अट नसते.तद्वत स्वत:च्या कळीला कुस्करून टाकणारा लिंगपिसाट बाप, अल्पवयीन मुलीला फसवून तिच्या देहाचा व्यापार करणारा नराधम,कथेत लेखकाने नव्या म्हणी,नवे वाक्प्रचार,नवे शब्द भरपुर भरले आहेत.हा कथासंग्रह आजच्या व्यवस्थेचं भंयकर वास्तव मांडतो आहे.माणसं किती हैवान झाली.कसा रघतपारखेपणा आला.कोरोनाच्या काळानंतर माणसातला क्रुरकर्मा पुढे आला.पण लेखक हरिश्चंद्र पाटील यांनी स्त्री कशी खंबीर होऊन लढते आहे.आजच्या युगाची तिचं जिजाऊ, झाशीची राणी, लक्ष्मीबाई, क्रांतीज्योती सावित्रीमाईचा वसा आणि वारसा घेऊन जाणारी स्त्री दाखविली आहे.या कथा म्हणजे आजचा समकाल व ग्रामीण शहरी वास्तवाचे चित्रण आहे.यातील संवाद पात्रेव्यक्ती चित्रे सृजनशील वर्णनातून म्हणीतून जगण्याच्या काटेरी फांद्यातून ही या कथेतील नायिका समर्थपणे संघर्ष करताना दिसून येते.हाच 'खरा वारस'दार'या माध्यमातून ही कथा सक्षम भक्कम सकस आशयसंपन्नता देऊन जाते.वाचकाभिमुखत्ता हे हरिश्चंद्र पाटील यांच्या कथेचे वैशिष्ट्ये आहे.'खरा वारस'आई बिबानं वंशाचं दिवट म्हणून वाडा कोडाचं तेल घातलं.बिनहाय गोड कौतुक केलं.अन् चंद्री मुलगी म्हणून तिला परंपरेचा साखळदंड घातला.शेवटी हिचं कोंडीबाच्या वंशाचा आणि खरा वारस ठरली'(पृ.२५) आजच्या समकालीन वास्तवाचे जगण्याचे चटके आपण अनुभवतो आहोत.सर्व सुखाचा लोंढा आलेला आहे.पण आपल्याचं वंशाने दगा दिला आहे.'नातं' नाळ तुटली अन् नातं झालं.नातं हे रक्ता माणसाचं असतं.पण आजच्या काळात हे नातं रघत पारखेपणा करतं आहे.नातं या कथेतील आजोबांची नातं आणि तिचा आपल्या मम्मी पप्पांशी असलेला संघर्ष मन पिळवटून टाकतो."मला शिकायचं मला लग्न करायचं नाही.आई बाबा तुमच्या सुखासाठी मी जगणार आहे.मला हुंडा घेणार नवरा पुढे त्याची दासी बटीक म्हणून मला जगायचं नाही.हा छकुलीचा आई बाबांशी संघर्ष करते.पण ती येयाच्या आत आजोबा मरून जातात.'माहेरची वाट' मुलीचं हे मायेच आगार आहे.पण तिचं माहेरची वाट दुर गेलीतर तिचे खडतर जगणे व संघर्ष करून आपल्या आईवडिलांच्या सेवेसाठी हजर राहते.'नवऱ्याला बायकोच्या कुंकवाशिवाय शोभा नसते हे त्याला फार उशीर कळालं होतं.गेलेली वेळ कधीच येत नसते.शितू आता कधीचं येणार नाही म्हणून.(पृ.५२) सासरी दिली सासरची झाली माहेराची वाट डोळे पाखरांची झाली.ही कथा वाचताना मन गहिवरून येते.खरचं बाईचा जन्म हा या विश्वात पुण्यवंत आहे.बाळ देऊन ही दोन्ही घराण्याचे नावं लौकिक करणारी माय माऊली या विश्वाची सावली.'बाजार आमटी'या कथेचं बीज सुरूची फरफट कथा जीव घेनी आहे.मुलगी आहे म्हणून गर्भपात करायचा.त्या मातेला नको तितकी औषध द्यायची तिची मरणयातनाची लढाई लढत असताना इथल्या पुरुष व्यवस्थेचा काटरी फांज घेऊन त्यावर ती जळते.पोटातला गर्भ मनाला पिळवटून टाकतो "आई मला आपल्या घरात राहू दे.मी हट्ट करणार नाय.मला नको ग मारू.आईssमला नको मारू आई ss (पृ.६७)असे अनेक गर्भपात आणि त्यात सरूचा अंत.हे सारे ओले मासाचे गोळे कुत्रे खातांना सुरूला आठवते त्यातच तिचा अंत होतो.हा माणूस म्हणून जगताना त्याला एका दिंडीच्या पंगतीत सुरू दिसते.केवळलेकरांच्या जन्मासाठी या बाईच्या आभाळभर वेदना.ती फक्त वासनांधाची भूक आणि लेकरांची माता.ही कथा मनाला उद्विग्न करून जाते.'वचन' मायेची शपथ,मायच्यान,आईची आन घालणारे आईच्या नावाचा शिवी देऊन उध्दार करतात या कथेत स्त्री विषयक 'वचन' "होय मीच ती सावित्री.तू म्हणाली होतीस ना शिकून मोठी हो.हे बघ मी कलेक्टर झाले.तुझा आशीर्वाद फळाला आला."(पृ ८३)ज्या मायबापानं मुलगी म्हणून ज्याच्या गळ्यात टाकली.त्यानं तिला आधार दिला.माय बाप आजी आणि बायडाकाकू गावा समोर सीताची सावित्री म्हणून या गावाला तिने दाखवून दिले.मुलींना शिकू द्या त्यांना लग्नाच्या बेडीत अडकवून फक्त मुलांना जन्म देण्यासाठीचं स्त्री नसते तर ती या मायभूमीचं ऋण फेडण्याचं ही काम करते.'सवाष्ण' सवाशीन,पती असल्याची कपाळकुंक ही खुण.पती वारल्यावर ती भूंड्या कपाळाची.ती आपल्या या रुढी परंपरेच्या व्यवस्थेत अभद्र तिला मुलं असलं तर रांडवपण घालने तिच्या वाट्याला येते इथल्या सताडं वाईट नजरा तिला जगू देतं नाही.तू असं विधवा होऊन राहणं म्हणजे कलंक आहे.हरिचंद्र पाटील नाना ही कथा एवढी मार्मिक करून टाकतात जणू या व्यवस्थेच्या तोंडावर थप्पड आहे.स्त्री ही शीलवंत कुलवंत भाग्यवंत आहे कारण ती जननी आहे.या कथेतील नायिका रुपमंती विधवा.यश कलेक्टर.त्याला किडनी देणारा मित्र.एका विधवेशी लग्न करणार कलेक्टर."कपाळावर कुंकू.पायात जोडवी.गळ्यात मंगळसूत्र.हातात हिरवा चुडा.पुन्हा तिच्या अंगावर सौभाग्य नांदू लागलं.असं नटूनथटून तिच्या वाट्याला सवाष्ण आलं'(पृ.९६) प्रेमळपणाचं, स्त्री दातृत्वाचं, मातृत्वाचं निखळ मैत्रीचं नाळ नातं जोडणारं हे 'प्रेमपत्र'शाम राधाची अस्सल प्रेमाची कहाणी डोळ्यात आणते दु:ख अश्रूची पाणी.यानी लिहिले अनेक प्रेमपत्र.साखरपुडाझाला आणि श्यामच्या मनाच्या घरावरचे उडाले पत्रं.तरी ही मुलगी म्हणून तिनं आपल्या मनाचा डोह करीत.श्यामतुला आयुष्यभर विसरणारा नाही अशी ग्वाही देते.अतिशय तरल भावबंध या कथेचे आहेत.मन व्याकुळ करुन जाणारी ही कथा.'सौभाग्यदान' दानात दान मांगल्याचं दान या देहाचं दानं सौभाग्य मागणे.स्त्रीत्व साकर करण्यासाठी तिला या निर्मिकांने हे सौंदर्य सौभाग्याचे दान दिले आहे.त्यामुळेचं ती महान आहे.याकथेत 'रुपाली तिच्या बाप पाप तिची कहाणी."बघा गुन्हेगार कोण? आणि सजा कुणाला?अरे हा समाज म्हणजे पारंपरिक अनिष्ट प्रथांनी, अंधश्रद्धांनीआणि गुन्हेगारीनं गच्च भरलेलं गढुळ पाण्याचं भल मोठं डपकं आहे"(पृ.१२९)या कथासुत्राचा आशय हा अत्यंत चिंतनशील आहे.देहदान,रक्तदान, नेत्रदान आहेच इथल्या विधवा, परित्यक्ता, विकलांग स्त्रियांना जर सौभाग्य दान करता आलं तर..खरचं या कथेत साक्षात ही माझी मुलगी.तिला स्वामीमान आहे.अशी प्रेरणा देऊन जाणारी कथा नाना लिहितात.'उठ बये तू उठ!हो सावित्रीची मुठ.या व्यवस्थेच्या बसं मानुटी.अन् धरून त्यांना कुट."लढ पोरी लढ'ही सईची कथा आईच्या उदरात असतांनाच आई तिला मारायला निघाली.पण आईचं रक्त कमी म्हणून हा गर्भपात टाळला.सईला आईची भीती वाटते ती शिक्षण घेऊन अधिकारी होते.'बेटी बचाव! बेटी पढाव!या चळवळीतून समाज जागृती करते."बघा मायबाप हो!खोटी आशा धरू नका.मुलगा करतो वर टांग.गर्भात मुली मारु नका.त्याचं फेडतात तुमचा पांग"(पृ.१३६)अशा साक्षेपी साक्षात वास्तवाचे भान देणाऱ्या स्त्री विषयक जाणिवांच्या कथा नाना लिहितात.मनोगत हे सुर्यप्रकाशाइतकं सजग आहे "स्त्रीवर अन्याय, अत्याचाराची दहशत बसवली.तिच्यावर गर्भात असल्यापासून अन्याय होऊ लागले.तिचं जगणं हराम करुन टाकलं.तिला दाशी बनवलं.गुलाम केलं.परंतू आता स्त्रीप्रधान संस्कृती उदयास येत आहे.आता स्त्री ही अबला नसून सबला आहे"(पृ.५मनोगत) ख्यातनाम साहित्यिक द.ता.भोसले यांची कथेची पाठराखण"या कथा वाचून कुणीही स्त्री अन्यायाविरुद्ध पेटुन उठेल एवढी ताकद या कथेत आहे.लेखकाने स्वरचित नव्या म्हणी,नवे वाक्प्रचार,नवे शब्द ओतप्रोत भरलेले आहेत.त्यामुळे त्यांची'खरा वारस'मधील लेखनशैली मराठी साहित्याच्या कोंदणात ठसा निर्माण करते."(ब्लर्ब) आदरणीय नानांच्या कथा लेखनास हार्दिक शुभेच्छा.



**पुस्तकाचे शिर्षक:-खरा वारस साहित्याचा प्रकार:-कथासंग्रहसाहित्यिकांचे नावं:-हरिश्चंद्र पाटील प्रकाशक:-परिस पब्लिकेशन, पुणे मुखपृष्ठ:-अरविंद शेलार,प्रकाशन दिनांक:-२६ जानेवारी २०२५किंमत:-३५०/रुपये पुस्तक परिचय:-डॉ प्रभाकर शेळके,जालना**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ मे २०२६


## आई मला म्हणते

आई मला म्हणते
बुडवू नको शाळा!
मनी मोत्याला कुठे आहे
पुस्तक पाटी फळा?

आई मला म्हणते
खेळू नकोस पाणी!
डबक्यात खेळणारा बेडूक
कसा ग गातो गाणी ?

आई मला म्हणते
बडबड नको जास्त!
पक्ष्यांचा किलबिलाट
कसा ग येतो मस्त?

आई मला म्हणते
खाऊ नकोस गोड!
मुंगीला का ग आहे
साखर खाण्याची खोड?

आई मला म्हणते
बाळ माझा छान!
धिंगा मस्ती केली की
का ग धरतेस कान ?




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


## जग सारे हादरले

कॉक्रोजचा वावर,
जगभर वाढू लागले.
कॉक्रोज म्हणाल्यावर,
तरूण पिढी जागले. १

कॉक्रोजचा वावर,
वाढू लागले जोमाने.
भ्रष्टाचारी त्रस्त झाले,
तरुणाईच्या रोषाने. २

तरुणाईच्या जागण्याने,
सिंहासन लागले डळू.
कॉक्रोजच्या धास्तीने,
भले भले लागले पळू. ३

कॉक्रोजच्या वावरण्याने,
वास्तव लागलंय कळू.
आंतरराष्ट्रीय पातळीवर,
प्रसिद्धी लागली मिळू. ४

कॉक्रोजच्या धुमश्चक्रीने,
आता जग सारे हादरले.
कॉक्रोजच्या शब्द क्रांतीने,
बिन पाण्यानेच भादरले. ५




**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


# पावसाळ्यापूर्वी नालेसफाई करा, अन्यथा आंदोलन; मुरूम शहर कृती समितीचा इशारा




**मुरूम (सुधीर पंचगल्ले) :** येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील लहान-मोठे नाले आणि गटारींमधील गाळ त्वरित उपसण्यात यावा, या मागणीसाठी मुरूम शहर कृती समितीने नगर परिषद कार्यालयीन अधीक्षक श्रीराम नाडे यांना शुक्रवारी (ता. २२) रोजी सिद्धलिंग हिरेमठ यांच्या स्वाक्षरीने निवेदन देण्यात आले आहे. वेळेत सफाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. समितीने निवेदनात नमूद केले आहे की, पावसाळा जवळ आला असतानाही शहरातील मुख्य नाले आणि अंतर्गत गटारींमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ, प्लॅस्टिक कचरा आणि माती साचलेली आहे. यामुळे पहिल्याच पावसात पाणी साचून सखल भागात आणि नागरिकांच्या घरात पाणी शिरण्याची शक्यता आहे. साचलेल्या घाण पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया यासारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण होईल. शहरातील मुख्य नाल्यांचा गाळ जेसीबी किंवा पोकलेन यंत्राच्या साहाय्याने काढून खोलीकरण करावे, अरुंद गल्ल्यांमधील गटारी कामगारांमार्फत युद्धपातळीवर स्वच्छ कराव्यात, नाल्यातून काढलेला ओला गाळ रस्त्यावर न ठेवता ट्रॅक्टरद्वारे तातडीने शहराबाहेर वाहून नेण्यात यावा, शहरातील सखल आणि संवेदनशील भागाची नालेसफाईला प्राधान्य द्यावे.नगर परिषदेने ही मोहीम पारदर्शकपणे राबवून नागरिकांच्या मालमत्तेचे आणि आरोग्याचे रक्षण करावे. सकारात्मक कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा पवित्रा मुरूम शहर कृती समितीने घेतला आहे. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील मुरूम शहर कृती समितीने नगर परिषद कार्यालयीन अधीक्षक श्रीराम नाडे यांच्याकडे निवेदन देताना सिद्धलिंग हिरेमठ...


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103
**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903